M.A.(Part-II)(Marathi)(with Credits)-Regular-Semester 2012 Sem. III

# MAMR232-1 - Prachin Madhyayugin Marathi Kavita Paper – I

**( प्राचीन - मध्ययुगीन मराठी कविता )**

P. Pages : 2 **GUG/W/16/2904**

Time : Three Hours Max. Marks : 80

---

**1.** पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील काव्यखंडाचे ससंदर्भ स्पष्टीकरण करा. **20**

**गट 'अ'**

क) जय जय सिध्दे । उदारे प्रसिध्दे ।
अनव्रत आनंदे । वर्त्तितिये ।।
विषयव्याळें मीठी । दीधलेयां उठणें नाहिं ताठि ।
ते तूझेनि वो गुरुद्रिष्टी । होये माए ।।

ख) शिशुपाळु वरू ऐसें आईकीलें बाळाः
श्रमु पातली नीऱ्हा जाली व्याकुळः
स्मरीले कृष्णरावो देवा संकष्टी पडली ए थोरीः
तुं एकुवांचौनिया सोडवीता अनु नाहीं अवधारीः

ग) काज नाहीं हो जनासी । रिझवावे त्या देवासी ।।
जन हांसतील मज । आतां जाले मी निर्लज्ज ।।
मागे पुढें नाही कोणी । सख्या विठ्ठला वांचुनी ।।
अनाथाचें करितो काज । म्हणोनी भरोसा आहे मज ।।
भागु म्हणे झाले निर्भई । आहे माझी विठाई ।।

घ) कुलालाचे कुंभ भाजल्याविण माती । काय आहे संगती पाणियाची ।।
मेणाची पुतळी घेतां करी बरी । अग्नींचे शेजारी राहे कैशी ।।
तैसा अधिरासी काय संतसंग । मृगजळा तरंग येतील कैसे ।।
ते आजि नवल देखिलें डोळां । दगड जैसा जळां वेगळेपण ।।

**किंवा**

**गट 'आ'**

च) म्हणौनिं माझां स्वरुपी । मनबुध्दि हे निक्षेपीं ।
एतुलेनि सव व्यापी । मी चि होंसि ।।
येया बोला काहिं । अनारिसें नाहिं ।
आपुली आण पाहिं । वांतु असें ।।

छ) भीमकु वीणवी अवधारा
जगनाथाः
सकळा राज्या कीजो आपुल्या
हाताः
मी तुमचा ताटकाढा होऊ नि
असैन ही वीश्वपतीः
बोलेति कृष्णरावो भुंजा
राणीव आमुची होती

munotes.in

ज)	नाम विठोबाचें घ्यावें । मग पाऊल टाकावें ।।
नाम तारक हें थोर । नामें तरिले अपार ।।
आजामेळ उध्दरिला । चोखामेळा मुक्तीस नेला ।।
नाम दळणीं कांडणीं । म्हणे नामयाची जनी ।।

झ)	भेटी लागीं जीवा लागलीसे आस । पाहे रात्रंदिवस वाट तुझी ।।
पोर्णिमेचा चंद्रमा चकोरा जीवन । तैसे माझें मन वाट पाहे ।।
दिवाळीच्या भूळा मोठी आस केली । पाहतां वाटुली मायबाप ।।
नामा म्हणे आम्ही लेंकराची जाती । भेटावया खंती वाटत से ।।

**2.** ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायाच्या आधारे परमेश्वर प्राप्तीचे उत्तरोत्तर सुलभ उपाय कोणते? ते लिहा. **15**

**किंवा**

ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायातील योग दुर्गाचे रुपक उलगडून दाखवा.

**3.** 'महदंबेचे धवळे' या कलाकृतीतील वाङ्मयीन सौंदर्य उलगडून दाखवा. **15**

**किंवा**

'महदंबेचे धवळे' या आख्यान काव्यातील श्रीकृष्ण व भीमक यांच्या व्यक्तिरेखा चित्रीत करा.

**4.** 'महाद्वाराच्या पायरीशी' या काव्यग्रंथाच्या आधारे संतांच्या आध्यात्मिक कार्यावर प्रकाश टाका. **15**

**किंवा**

'महाद्वाराच्या पायरीशी' तिष्ठत राहिलेल्या संतांच्या अभंगवाणीचे स्वरूप कसे आहे. सविस्तर लिहा.

**5.** 'भावकवी' म्हणून संत नामदेवांच्या काव्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा. **15**

**किंवा**

नामदेवाच्या नामस्मरण भक्तिचा परिचय करून द्या.

******************



munotes.in